Phon No.: -020-26123066/67 Email: mscepune@gmail.com Website:www.mscepune.in

**अधिसूचना**
परीक्षा प्राधान्य

क्र.मरापप/NTS/इ.10वी/2016-17/स-3/4950
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
17, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-1.
दिनांक : 03 /08/2016

प्रति,

1. शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
   जिल्हा परिषद------------------ (सर्व)
2. शिक्षण निरीक्षक,
   बृहन्मुंबई (दक्षिण/पश्चिम/उत्तर विभाग)

**विषय:- राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (NTS) 2016-17**
**इ. 10 वी साठी राज्यस्तर परीक्षा दि. 06 नोव्हेंबर, 2016**
**राष्ट्रीयस्तर परीक्षा दि. 14 मे, 2017 अधिसूचना व आवेदनपत्रे स्विकृतीबाबत.**

उपरोक्त परीक्षेबाबत परीक्षेचे प्रसिध्दी निवेदन दि.3 /08/2016 रोजी प्रसिध्दी माध्यमांना देण्यात आलेले आहे व त्याची एक प्रत आपणाकडे पाठविण्यात आलेली आहे. त्यास आपल्या स्तरावरुन प्रसिध्दी देण्यात यावी.

त्यात उल्लेख केल्यानुसार राज्यस्तरीय राष्ट्रीय प्रज्ञाशोध (NTS) परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्रे परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर दि. 03.08.2016 ते 31.08.2016 पर्यंत उपलब्ध होणार आहेत. सदर परीक्षेची सर्व माहिती, माहितीपत्रक व ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्याच्या सूचना वेबसाइटवर टाकण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त सर्व सूचनांचा विचार करुन प्रशालांनी खालीलप्रमाणे कृती करणे अपेक्षित आहे.

1. विद्यार्थ्यांची आवेदनपत्रासाठी आवश्यक असणारी माहिती व मूळ प्रमाणपत्रांच्या सत्यप्रतीचे आवश्यक फीसह संकलन करणे.
2. प्रती विद्यार्थ्यांकडून रु. 120/- जमा फी मध्ये संस्था संलग्नता शुल्क रु. 200/- प्रतिसंस्था, प्रति शैक्षणिक वर्ष मिळून एकूण रक्कमेचा भरणा NTS परीक्षेसाठी स्वतंत्रपणे चलनांद्वारे स्टेट बँकेत करणे. यासाठी आवश्यक चलन फॉर्म परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करता येईल.
3. संबंधित परीक्षेची रक्कम जमा चलन, विद्यार्थ्यांची माहिती व शाळेचा (खात्री करुन घेतलेला) स्कूल कोड यासह ऑनलाईन आवेदनपत्रे भरणे.
4. भरलेल्या आवेदनपत्राची व 'S' फॉर्मची प्रिंट-आऊट घेणे.

5. संबंधित विद्यार्थ्याच्या आवेदनपत्राच्या व 'S' फॉर्मच्या प्रिंट-आऊटवर विद्यार्थी, पालक व मुख्याध्यापक यांची स्वाक्षरी घेणे. त्यासोबत जात व अपंगत्व प्रमाणपत्राच्या सत्यप्रती जोडणे. सर्टिफिकेटवर मुख्याध्यापकांनी सही करुन शिक्का उमटवणे. तीन प्रतीत 'S' फॉर्म भरुन देणे.
6. उपरोक्त सर्व बाबी चलनासह जिल्हयाच्या वेळापत्रकाप्रमाणे (दि. 31 ऑगस्ट 2016 नंतर) शिक्षणाधिकारी (माध्य.)/शिक्षण निरीक्षक/परीक्षेच्या केंद्राची प्रशाला यांचेकडे सादर करणे / पोहोच घेणे.
7. विलंब शुल्कासहची आवेदनपत्रे उपरोक्तप्रमाणेच स्विकारणे व दि. 01.10.2016 पूर्वी सादर करणे.

शिक्षणाधिकारी (माध्य.) / शिक्षण निरीक्षक यांनी प्रशालेकडून आलेल्या नियमित आवेदनपत्रासोबतच्या उपरोक्त बाबी परीक्षा परिषदेकडे वेळापत्रकाप्रमाणे दि. 06.09.2016 ते दि.09.09.2016 दरम्यान परिषदेत सादर करणे अपेक्षित आहे. यादरम्यान त्यासाठीचे वेळापत्रक व सविस्तर सूचना देण्यात येतील.

(रा. वि. गोधने)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-1.

प्रत- माहितीस्तव सादर:

1. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, शिक्षक भवन, पुणे-30.
2. मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे - 30

माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी:

1. शिक्षण उपसंचालक, ------------------- (सर्व विभाग)
2. संचालक, राज्य विज्ञान शिक्षण संस्था, रविनगर, नागपूर

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

## 17, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे - 411 001

## राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा(NTS) इ. 10 वी साठी 2016-17

**राज्यस्तर परीक्षा दि. 06 नोव्हेंबर 2016** **राष्ट्रीयस्तर परीक्षा दि. 14 मे, 2017**

## माहितीपत्रक

1. **योजनेचे उद्दिष्ट-** इयत्ता 10 वीच्या अखेर प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन बुध्दिमान विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने त्यांना आर्थिक सहाय्य करावे, या सहाय्यातून त्यांची बुद्धिमत्ता विकसित व्हावी आणि त्या विकसित बुध्दिमत्तेने त्या विद्यार्थ्यांनी आपली विद्याशाखा व राष्ट्र यांची सेवा करावी, ही या योजनेची उद्दिष्टे आहेत.

2. **विकेंद्रीकरण पध्दती:-** राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (एन. सी. ई. आर. टी.) यांनी 2012-13 पासून राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा इ. 10 वी साठी दोन स्तरांवर घेण्याचे ठरविले आहे

अ) **राज्यस्तरीय प्रज्ञा शोध परीक्षा :-** महाराष्ट्र राज्यासाठी ही परीक्षा, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे, यांच्यामार्फत जिल्हयातील विविध केंद्रावर सर्वसाधारण नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या/तिसऱ्या रविवारी घेण्यात येते. (यावर्षी दि. 06/11/2016 रोजी)

ब) **राष्ट्रीयस्तर प्रज्ञा शोध परीक्षा :-** राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (एन. सी. इ. आर. टी.) यांच्यामार्फत सदर परीक्षा मे महिन्यात घेण्यात येते. (यावर्षी 14/05/2017 रोजी) राष्ट्रीयस्तर परीक्षा महाराष्ट्रातील दोन केंद्रावर होईल. राज्यस्तरीय NTS परीक्षा यातून राष्ट्रीयस्तरासाठी निवड झालेल्या उमेदवारांनाच अंतिम परीक्षेस बसता येते.

3. **पात्रता:-** महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही शासनमान्य शाळेतील इयत्ता 10 वी मध्ये शिकत असलेल्या नियमित विद्यार्थी विद्यार्थीनीस राज्यस्तर परीक्षेस बसता येते. त्यासाठी वयाची, उत्पन्नाची अगर किमान गुणांची अट नाही. तसेच कोणतीही पूर्व परीक्षा देण्याची अट नाही. तसेच ओपन डीस्टन्स लर्निंग (ODL) स्कूल योजनेखाली नोंदविलेले खालील अटी पूर्ण करणारे विद्यार्थीही या परीक्षेसाठी पात्र ठरतात.

   अ) 1 जुलै 2016 रोजी ज्यांचे वय 18 पेक्षा कमी आहे.

   ब) जे नोकरी करीत नाहीत.

   क) जे इ.10 वी च्या परीक्षेला पहिल्यांदाच बसत आहेत.

4. **अर्ज करण्याची पध्दत:-** दिनांक 01 ऑगस्ट, 2016 पासून ऑनलाइन आवेदनपत्रे परिषदेच्या वेबसाईटवर (www.mscepune.in) शाळांना उपलब्ध होतील. ती आवेदनपत्रे संबंधित प्रशालांनी दि. 31.08.2016 पर्यंत ऑनलाईन भरावीत. ऑनलाईन भरलेल्या आवेदनपत्राच्या प्रिंट आऊटस् विद्यार्थी, पालक व मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीसह, जात व अपंगत्व यांच्या सत्य प्रतीसह, S

फॉर्मसह व रक्कम भरलेल्या SBI चलनासह शिक्षणाधिकारी यांनी दिलेल्या मुदतीपूर्वी (31 ऑगस्ट 2016 नंतर) त्यांचेकडे सादर करावीत.

5. **निवडपध्दती :-** या शिष्यवृत्तीसाठी दोन स्तरावर परीक्षा घेण्यात येते.

अ) राज्यस्तरीय प्रज्ञा शोध परीक्षा ब) राष्ट्रीयस्तर प्रज्ञा शोध परीक्षा

महाराष्ट्रातील विविध केंद्रावर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) किंवा शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई यांचेमार्फत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद ही परीक्षा घेते. सदर परीक्षेचे वेळापत्रक व विषय खालील प्रमाणे असतात.

| अ.क्र. | विषयाचे नाव | एकूण गुण | एकूण प्रश्न | कालावधी | वेळ | पात्रता गुण (प्रत्येक विषयात किमान) |
|---|---|---|---|---|---|---|
| 01. | बौध्दिक क्षमता चाचणी<br>Mental Ability Test | 50 | 50 | 45 मिनिटे (फक्त दृष्टी अपंगांसाठी 15 मिनिटे जादा वेळ) | 10.30 ते 11.15 | 40% |
| | | | विश्रांती | | | |
| 02. | शालेय विषय भाषा चाचणी (मराठी / इंग्रजी)<br>Scholastic Aptitute Test Language Testing (Marathi/English) | 50 | 50 | 45 मिनिटे (फक्त दृष्टी अपंगांसाठी 15 मिनिटे जादा वेळ) | 11.45 ते 12.30 | 40% |
| | | | विश्रांती | | | |
| 03. | शालेय क्षमता चाचणी (भाषेतर शालेय विषय) Scholastic Aptitute Test (Subject other than Languages) | 100 | 100 | 90 मिनिटे (फक्त दृष्टी अपंगांसाठी 30 मिनिटे जादा वेळ) | 14.15 ते 15.45 | 40% |

* (SC, ST व अपंग यांचे साठी पात्रता गुण 35% आहेत.)

**अ) पेपर -1ला :- बौध्दिक क्षमता चाचणी** (MAT)

ही मानसशास्त्रीय चाचणी असून, त्यामध्ये कार्यकारण भावविश्लेषण, संकलन इत्यादी संकल्पनांवर आधारित 50 बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न असतील.

**ब) पेपर - 2रा :- भाषा चाचणी (मराठी /इंग्रजी) (LT)**

भाषा विषयक 50 बहूपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न

**क) पेपर - 3रा :- शालेय क्षमता चाचणी** (SAT)

ही सामान्यत: 9 वी व 10 वीच्या अभ्यासक्रमांवर आधारित असेल. त्यामध्ये 1) सामान्य विज्ञान 2) समाज शास्त्र 3) गणित असे तीन विषय असतील. या तीन विषयांचे एकूण 100 प्रश्न सोडवायचे असतात.

सामान्य विज्ञान 40 गुण+समाज शास्त्र (इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र)- 40 गुण+गणित व भूमिती- 20 गुण = एकूण 100 गुण

➢ **उपविषयवार गुणांची विभागणी खालीलप्रमाणे असेल.**

a) सामाजिक शास्त्र:- इतिहास 15 गुण, भुगोल 15 गुण, राज्यशास्त्र 05 गुण, अर्थशास्त्र 05 गुण.

b) मुलभूत विज्ञान:- भौतिकशास्त्र 13 गुण, रसायनशास्त्र 13 गुण, जीवशास्त्र 14 गुण.

6. **माध्यम:-** प्रश्नपत्रिका मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराथी, उर्दु, सिंधी, कन्नड व तेलुगू या आठ माध्यमातून उपलब्ध असतील. यापैकी कोणतेही एकच माध्यम घेता येईल. सेमी इंग्लिश विद्यार्थ्यांना मूळमाध्यमाबरोबर विज्ञान - गणित विषयांसाठी इंग्रजी माध्यमाची प्रश्नपत्रिका देण्यात येईल. तिन्ही प्रश्नपत्रिकांसाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिल्या जातील. प्रत्येक प्रश्नक्रमांकापुढे पर्यायांसाठी 4 वर्तुळे असतील. योग्य पर्यायाच्या क्रमांकाखालील वर्तुळ काळे करून उत्तर नोंदवायचे असते.

7. **परीक्षेचे मूल्यमापन:-** विद्यार्थ्यांनी सोडविलेल्या उत्तरपत्रिकांची तपासणी संगणकामार्फत OMR पध्दतीने करण्यात येते. खबरदारीचे सर्व उपाय योजून बिनचूक गुणयादी तयार करण्यात येते. त्यानुसार महाराष्ट्रातील एकूण 366 विद्यार्थी राष्ट्रीयस्तर परीक्षेसाठी पात्र होतात. (अनुसूचित जातींसाठी 15% शिष्यवृत्त्या आणि अनुसूचित जमातींसाठी 7.5% शिष्यवृत्त्या राखून ठेवण्यात आलेल्या आहेत. तसेच अपंगासाठी 3% आरक्षण प्रत्येक संवर्गात लागू करण्यात आले आहे.)

8. **राष्ट्रीयस्तर प्रज्ञा शोध परीक्षा:-** राज्यस्तरीय परीक्षेतून तयार केलेल्या NTS विद्यार्थ्यांच्या गुणयादीतून राज्याला ठरवून दिलेल्या कोटयानुसार निवडलेल्या उमेदवारांनाच अंतिम परीक्षेस बसता येते. अंतिम परीक्षा राष्ट्रीय शैक्षणिक व प्रशिक्षण परिषद (N.C.E.R.T.) नवी दिल्ली यांचेमार्फत दरवर्षी साधारणत: मे महिन्यात मुंबई आणि पुणे येथे घेण्यात येते. (यावर्षी 14 मे 2017 रोजी) लेखी परीक्षेच्या स्वरुपाबाबत दरम्यानच्या काळात NCERT नवी दिल्ली यांचेमार्फत प्रसिध्दी देण्यात येईल.

9. **शिष्यवृत्ती:-** अखिल भारतीय पातळीवर शिष्यवृत्तींची संख्या 1000 असून यासाठी SC साठी 150, ST साठी 75 आणि खुल्या प्रवर्गासाठी 775 शिष्यवृत्त्या ठरवून दिलेल्या आहेत. तसेच संबंधित संवर्गात 3% अपंगांसाठीचे आरक्षण असेल.

10. **शिष्यवृत्ती दर:-** शिष्यवृत्ती धारकांना खालीलप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येईल.

| अ.क्र. | तपशील | दरमहा शिष्यवृत्ती रू. |
|---|---|---|
| 1 | शालान्त परीक्षेनंतर + 2 स्तरावर दोन वर्ष (इ.11 वी व इ.12 वी) | 1250 |
| 2 | सर्व शाखांच्या प्रथम पदवीपर्यंत (उदा. B.A., B.COM. B.Sc.) | 2000 |
| 3 | सर्व शाखांच्या द्वितीय पदवीपर्यंत (पदव्युत्तर पदवीपर्यंत) | 2000 |
| 4 | Ph. D. साठी 4 वर्षापर्यंत<br>(व्यवसायिक अभ्यासक्रम वगळून इतर शाखांसाठी) | विद्यापीठ आयोगाचे<br>नियमानुसार मान्य दराने |

(रा. वि. गोधने)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-1.

## राष्ट्रीय प्रज्ञाशोध (NTS) परीक्षेसंदर्भात मुख्याध्यापक आणि परीक्षार्थीसाठी सूचना- इ. 10 वी साठी परीक्षा दि. 06.11.2016

### शाळांनी ऑनलाइन आवेदनपत्रे भरण्यापूर्वी सर्व सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

1. महाराष्ट्र शासन/केंद्र शासनमान्य शाळेत नियमितपणे इयत्ता 10 वी च्या वर्गात शिकत असणारे विद्यार्थीच या परीक्षेस बसण्यास पात्र असतील. तसेच ओपन डीस्टन्स लर्निंग (ODL) स्कूल योजनेखाली नोंदविलेले खालील विद्यार्थीपण या परीक्षेसाठी पात्र ठरतात.
   अ) 1 जुलै 2016 रोजी ज्यांचे वय 18 पेक्षा कमी आहे. ब) जे नोकरी करीत नाहीत.
   क) जे 10 वी साठी पहिल्यांदाच बसत आहेत.
2. पूर्ण भरलेल्या ऑनलाईन आवेदनपत्राची प्रिंटआऊट विहित जात, अपंगत्व व उत्पन्न यांच्या सत्य प्रतीसह परीक्षा शुल्कासह चलनाने (परीक्षा शुल्क रु. 120/-) व शाळेच्या संलग्नता शुल्कासह (रु. 200/- प्रतिसंस्था) शाळेच्या मुख्याध्यापकांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) किंवा शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडे वेळापत्रकाप्रमाणे (दि. 31.08.2016 नंतर) सादर करावीत. मुख्याध्यापकांनी प्रशालेतील विद्यार्थ्यांची फी व संस्था संलग्नता फी यांचे परिषदेच्या संकेतस्थळावर दिलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया च्या चलनाद्वारे "महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे" यांचे नावे भरावे.
3. अपूर्ण आवेदनपत्रे स्वाक्षरी नसलेली आवेदनपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत. ती कोणत्याही वेळी रद्द करण्यात येतील.
4. प्रशालेतील विद्यार्थी ज्या परीक्षा केंद्रातून परीक्षा देऊ इच्छितात त्या केंद्राचा 'केंद्रसंकेतांक' आवेदनपत्रावर नोंदवावा. तसेच शाळा संकेतांक समाविष्ट असलेल्या शाळेचा शिक्का आवेदनपत्रावर असणे आवश्यक आहे. शाळा संकेतांक, विज्ञान पर्यवेक्षक आपल्या तालुक्याचे गट शिक्षण अधिकारी / परीक्षा परिषद यांच्याकडे मिळतील. नवीन शाळा संकेतांकासाठी (School code) शाळेच्या लेटरहेडवर पत्र लिहून मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीने परिषदेस इमेल/पोस्टाने पाठवावे.
5. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने दिलेले प्रवेशपत्र विद्यार्थ्यांने परीक्षेच्या वेळी परीक्षागृहात घेऊन जावे. ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवडयात सदर प्रवेश पत्रे शिक्षणाधिकारी/शिक्षण निरीक्षक यांचेकडे पाठविली जातात. प्रवेशपत्रे संबंधित शाळांनी घेऊन जावीत.
6. विद्यार्थ्यांना परीक्षा सुरु होण्यापूर्वी किमान 30 मिनिटे अगोदर परीक्षेच्या ठिकाणी उपस्थित रहावे.
7. परीक्षा प्रवेशपत्रावर परीक्षार्थीनी मुख्याध्यापकांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करावी. तसेच त्यावर मुख्याध्यापकांचा शिक्का व सही असावी.
8. i) बौध्दिक क्षमता कसोटी (MAT), ii) भाषिक कसोटी (LT) मराठी / इंग्रजी भाषिक कौशल्ये iii) शालेय क्षमता कसोटी (SAT) या तिन्ही प्रश्नपत्रिकांसाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिल्या जातील.
9. उत्तरपत्रिकेवर प्रश्नक्रमांकाच्या पुढे चार वर्तुळे दिली आहेत. योग्य पर्यायाच्या पुढील वर्तुळ काळे करुन उत्तरे नोंदवावयाची आहेत.
10. परीक्षेस येताना स्वत:चे लेखनसाहित्य आणावयाचे आहे.
11. परीक्षेस येण्या-जाण्याचा खर्च परीक्षार्थीना स्वत: करावयाचा आहे.

12. राज्यस्तर परीक्षेतून निवड झालेल्या उमेदवारांना या कार्यालयामार्फत पत्राने कळविले जाते. उमेदवार आपला क्रमांक www.mscepune.in या परिषदेच्या संकेतस्थळावर टाकून निवडीबाबतची स्थिती साधारण 15 मार्च नंतर जाणून घेवू शकतील. तसेच निवड झालेल्या उमेदवारांना दिनांक 14 मे, 2017 रोजी होणाऱ्या राष्ट्रीयस्तर परीक्षेचे प्रवेशपत्र NCERT मार्फत पाठविले जाईल. प्रशालांनी विद्यार्थ्यांच्या गुणयाद्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून प्राप्त करुन घ्यावयाच्या आहेत.
13. परीक्षार्थींनी हे लक्षात घ्यावे की, ही निवड परीक्षा आहे, पात्रता परीक्षा नव्हे.
14. सदर परीक्षेसाठी फेरपडताळणी किंवा पुनर्मूल्यांकनाची पध्दत नाही.
15. तपासण्यात आलेल्या उत्तरपत्रिकांच्या झेरॉक्सप्रती / सत्यप्रती / छायांकितप्रती संबंधीत परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांने 15 दिवसाचे आत अर्ज करुन मागणी केल्यास प्रत्येक उत्तरपत्रिकेस रु. 100/- शुल्क आकारुन देण्यात येईल.
16. **फक्त SC, ST जातीच्या उमेदवारांनीच** आवेदनपत्रासोबत जातीच्या दाखल्याची प्रमाणित सत्यप्रत प्रशाळेत सादर करावी. अपंग उमेदवारांनी सक्षम अधिकाऱ्यांच्या दाखल्याची सत्यप्रत प्रशालेत सादर करावीत. जातीचा दाखला तसेच अपंग विद्यार्थ्यांबाबतचा दाखला सक्षम अधिकाऱ्यांचा असणे आवश्यक आहे. याबाबत आवेदनपत्रातील माहितीची मुख्याध्यापकांनी अभिलेखावरुन तपासून / खात्री करुनच आवेदनपत्रे परिषदेकडे पाठवावीत. अन्यथा याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
17. **उत्तरपत्रिकेचे मूल्यांकन करताना वजा गुण (Negative Marking) पध्दतीचा अवलंब राज्यस्तर परीक्षेत केला जात नाही.** राष्ट्रीयस्तर परीक्षेत प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी 1/3 गुण प्राप्त गुणातून कपात करण्यात येईल.
18. ऑनलाइन आवेदनपत्रे भरणे, प्रिंट आऊट आवेदनपत्रे विद्यार्थी, पालक यांच्या स्वाक्षरीसह एकत्रित S फॉर्म व फीच्या आवश्यक SBI चलनासह शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे सादर करणे ही प्रशालेच्या मुख्याध्यापकांची जबाबदारी आहे. कोणत्याही परिस्थितीत पालकांना आवेदनपत्रे नेण्यासाठी / भरलेली आवेदनपत्रे सादर करण्यासाठी शिक्षणाधिकारी कार्यालयात पाठविण्यात येऊ नये. तसेच विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे शाळेमार्फत एस.फॉर्म सह सादर होणे अपेक्षित आहे. प्रशालेने प्रवेशपत्रे ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवडयात आणि गुणयाद्या मार्चच्या पहिल्या आठवडयात शिक्षण अधिकारी कार्यालयातून घेऊन जाणे अपेक्षित आहे.
19. आवेदनपत्रे सादर करण्याच्या अंतिम दिनांक व शुल्काचे दर :-

| अ.क्र | तपशील | अंतिम दिनांक | शुल्क रु. | शाळा संलग्नता फी |
|---|---|---|---|---|
| 1 | नियमित | 31.08.2016 | 120/- | संलग्नता फी रु. 200/- प्रति संस्था प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी |
| 2 | विलंब शुल्कासह | 30.09.2016 | 220/- | |

(रा. वि. गोधने) 3/8

आयुक्त,

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-1.**

# INSTRUCTIONS TO CANDIDATES/PRINCIPAL OF SCHOOL STATE LEVEL NATIONAL TALENT SEARCH EXAMINATION 2016-17 STD.10TH

The School persons should read the instructions carefully before filling the online application.

1) Only Regular Students studying in schools recognised by Maharashtra State/Central Government are eligible. Students appearing to 10th Std. through distance education are also eligible provided they are below age 18th years unemployed and appearing for the first time to X Std.

2. Printouts of filled up forms alongwith examination fee (Rs. 120/- per student, affiliation fee Rs. 200/- per institute per academic year) paid by single challan are to submitted to Education Officer (secondary) / Education Inspector (in case of Mumbai) / Examination Centre according to time table by dt.31/08/2016. Fee & affiliation fee is to be paid by SBI challan infavour of Maharashtra State Council of Examination, Pune.

3. Incomplete / wrongly filled / without signature application forms are liable to be rejected & no correspondence will be entertained in connection with it.

4. Centre code of concerning centre from which the school students are going to appear must be given. The school stamp containing school code is necessary School code can be known by Block Education Officer or Science Supervisor.

5. Before entering the examination hall the student should bring the admission card given by Maharashtra State Council of Examination. Admission cards will be sent to Education Officers/ Education Inspectors in third week of October. The schools will collect them from E.O. / E.I.

6. The student is expected to be present in examination hall 30 minutes prior to the commencement of the examination.

7. Signature of student on hall ticket to be done in presence of school head master and the H.M. should sign it with school seal on it.

8. The three answer sheets i.e. MAT & SAT English / Marathi Language Testing and for subjects other than Languages will be given separately.

9. Answers to questions are to be noted by encircling (darkening) the appropriate circles by black ball-pen only.

10. The students will come alongwith their own writing material.

11. Candidate will not be given any to and fro allowance.

12. Candidates selected for national level examination from State Level exam shall be informed by this office. However the candidates can know their result of state level exam by entering their seat number on MSCE website www.mscepune.in The admission cards for national level examinations to be held on 14th May 2017 shall be sent by NCERT, New Delhi.

    The Schools should collect the "school wise result lists" from E.O. (Sec.)/E.I.

13. The students should remember that this is selection examination & not eligibility examination.

14. Revaluation facility is not available for this examination.

15. Xerox copy / Photocopy / True copy / of examined answer sheet will be supplied to the student who have applied for it within 15 days from declaration of result. Fee of Rs. 100/- per answer sheet will be charged for it.

16. **Only SC, ST candidates** shall submit copy of caste certificate in their school. Disable students also required to submit the true copy of certificate given by competent authority. Caste certificate & disable certificate given by competent authorities shall be considered. The School H.M. should confirm the information given in the application from originals and school record and then send the application forms. To avail the reservation facility true copies of necessary documents must be submitted to Maharashtra State Council of Examination, Pune-1 no complains shall be entertained afterwards.

17. **While assessing the answer papers at State Level no Negative Marketing System is followed. For National Level 1/3 mark per wrong Answer will be deducted from secured marks.**

18. **Filling up of online forms shall be done by school only**, Printouts of application forms with signatures of students & parents on it shall be submitted to E.O. / E.I. These documents will be submitted alongwith 2 copies of 'S' form & single challan of SBI for each school. This should be done only by school. In any case the guardians should not be refered to contact E.O. /E.I. or higher authority Filled up Application Forms shall be received only through schools.

    Admission cards and school result will be available to E.O. / E.I. available in 3rd week of October and first week of March and to be collected by schools.

19. Last date & rate of fees for submission of application form.

| Sr.No. | Description | Last Date | Fee Rs. | Affiliation Fee |
|---|---|---|---|---|
| 1 | Regular Application Form | 31.08.16 | 120/- | Rs.200/- per institute per Academic Year |
| 2 | Late Application Form | 30.09.16 | 220/- | |

(R. V. Godhane)
Commissioner,
Maharashtra State Council
of Examination, Pune